Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक जन

सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

ऊसदरासाठी स्वाभिमानीचा दुहेरी एल्गार! (पान २ वर)



। सोमवार, दि. २ नोव्हेंबर २०२६ । वर्ष १ । अंक २०२ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

Selected

साक्ष दिल्याने प्रौढाला वाळूमाफियाने डंपरखाली चिरडले !

मुंबई । पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. तपासादरम्यान तलाठी महेंद्र पाटील यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. त्यावेळी शरद रतन पाटील शासकीय पंच म्हणून उपस्थित होते. याचाच राग धरून विपुल याने त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली होती.वाळूने भरलेल्या डंपरखाली ढकलून एका व्यक्तीला जाणीवपूर्वक चिरडून ठार मारल्याची धक्कादायक घटना अमळनेर तालुक्यातील नांद्री येथे शनिवारी रात्री घडली. रात्री पावणेदहा वाजेच्या सुमारास गावातील बसस्थानकासमोर हा प्रकार घडला. शरद रतन पाटीलवाळूचे ट्रॅक्टर लावण्यावरून वाद २८ ऑक्टोबर रोजी नगाव बुद्रुक येथील ज्ञानेश्वर गोसावींच्या घरासमोर झाला होता. यातून विपुल, सागर, मयूर व संजयगिर गोसावी यांनी ज्ञानेश्वर गोसावी व त्यांच्या पत्नीला मारहाण केली होती. याप्रकरणी अमळनेर (वय ५२) असे मृताचे नाव आहे. यापूर्वी वाळू वाहतुकीवरून झालेल्या मारहाणीच्या गुन्ह्यात शासकीय पंच म्हणून साक्षीदार राहिल्याचा राग मनात धरून हा खून केल्याचा आरोप आहे.

‘हा राजकीय पक्षाचा नाही, तर देशातील तरुणांचा आणि शेतकऱ्यांचा आवाज’ : राहुल गांधी

‘ज्ञानेश कुमारांशिवाय मोदी पंतप्रधान झालेच नसते’

जन सम्राट टाईम्स

नागपूर | देशातील लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी ‘इंडिया’ आघाडीच्या वतीने रविवारी दिल्लीतील ऐतिहासिक रामलीला मैदानावर भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारवर जोरदार टीका केली.

रामलीला मैदानावर ‘इंडिया’ आघाडीचा एल्गार!



“मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या मदतीशिवाय नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान होऊच शकले नसते,” असा थेट आरोप करत राहुल गांधी यांनी ‘मतचोरी’च्या मुद्द्यावरून सरकारची कोंडी केली. या महामोर्चामध्ये काँग्रेससह ‘इंडिया’ आघाडीतील अनेक प्रमुख घटक पक्ष, विविध राज्यांचे मुख्यमंत्री आणि विरोधी नेते सहभागी झाले होते.रामलीला मैदानावरील सभेला संबोधित करताना राहुल गांधी म्हणाले, “नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्यापर्यंत जो संदेश पोहोचवायचा होता, तो या जनसागराने पोहोचवला आहे. हा केवळ एका राजकीय पक्षाचा आवाज नाही, तर देशातील तरुण, शेतकरी आणि सामान्य जनतेचा हुंकार आहे. या देशातील लोकशाही आम्ही कोणत्याही परिस्थितीत संपुष्टात येऊ देणार नाही. तुमच्याकडे प्रचंड पैसा असेल, तुम्ही स्वतःला खूप मोठे समजत असाल; पण लक्षात ठेवा, तुम्ही संविधानापेक्षा मोठे नाही.” विरोधी पक्षनेत्यांनी विद्यार्थी, नागरिक आणि सामाजिक संघटनांना या चळवळीत सहभागी होण्याचे आवाहन केले होते. तसेच सणासुदीच्या काळात स्थानिक विक्रेत्यांना पाठिंबा देण्यासाठी त्यांच्याकडून खरेदी करण्याचे आवाहनही त्यांनी आंदोलकांना केले.देशाची व्यवस्था रुळावर आणण्यासाठी सर्वात आधी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवणे गरजेचे असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले.“अमित शाह म्हणतात की नरेंद्र मोदी कुठेही जाणार नाहीत. पण मी सांगू इच्छितो की, जनता त्यांना सत्तेत राहू देणार नाही. ज्ञानेश कुमार यांच्यानंतर या प्रकरणात जबाबदार असणाऱ्या प्रत्येकावर कायदेशीर कारवाई केली जाईल,” असा इशाराही त्यांनी आपल्या भाषणात दिला.‘मतचोरी’च्या मुद्द्यावरून देशातील विरोधी पक्षांची ‘इंडिया’ आघाडी चांगलीच आक्रमक झाली आहे. रविवारी दिल्लीतील ऐतिहासिक रामलीला मैदानावर ‘इंडिया’ आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी एकत्र येत केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाविरोधात जोरदार एल्गार पुकारला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत “ज्ञानेश कुमार पदावरून हटत नाहीत, तोपर्यंत आमचा लढा सुरूच राहील,” असा स्पष्ट इशारा विरोधी नेत्यांनी दिला.काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्यावर जोरदार निशाणा साधला. “मोदी आणि शाह हे महिला, युवक आणि दलितांची मते ‘चोरी’ करण्याचा प्रयत्न करत आहेत. आता जनतेनेच त्यांना निवडून दिलेले नाही, तर ते स्वतःच्या सोयीचे मतदार निवडत आहेत,” असा गंभीर आरोप खर्गे यांनी केला. मुख्य निवडणूक आयुक्तांना इशारा देताना खर्गे म्हणाले, “ज्ञानेश कुमार जोपर्यंत पद सोडत नाहीत, तोपर्यंत हा लढा थांबणार नाही. ते अगदी भूगर्भात जाऊन लपले तरी देशातील जनता, महिला आणि तरुण त्यांना शोधून बाहेर काढतील.”

अयोध्येत चंदा चोरला: अखिलेश यादव

समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी अयोध्येतील राम मंदिराच्या दानामध्ये झालेल्या चोरीचा मुद्दा उपस्थित करत भाजपावर जोरदार हल्ला चढवला. “ज्यांनी मतचोरी, चंदाचोरी आणि देवाच्या दानाची चोरी केली आहे, त्यांचा अंत निश्चित आहे,” असे अखिलेश म्हणाले.उत्तर प्रदेशातील राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना त्यांनी दावा केला की, “इंडिया आघाडीने आवाज उठवल्यानंतर आता भाजपालाही जाग आली आहे. यूपीमध्ये भाजपा स्वतःच हिंदूंची मते कापल्याचा दावा करत आहे. भाजपाला देशात फक्त स्वतःच्याच कार्यकर्त्यांना मतदार आणि नागरिक म्हणून पाहायचे आहे.अखिलेश यादव यांनी अयोध्येतील राम मंदिराच्या दानामध्ये झालेल्या चोरीचा मुद्दा उपस्थित करत भाजपावर जोरदार हल्ला चढवला.

गोकुळ दूध संघाच्या घडामोडीत आणखी लेटर बॉम्ब; चंद्रकांत पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेलं पत्र समोर

जन सम्राट टाईम्स

कोल्हापूर । प्रतिनिधी: कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळच्या अध्यक्षपदाच्या निवडीवरून (Gokul Election Result 2026) घमासान रंगलं आहे. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीमध्ये राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीला 13 जागा मिळाल्या आहेत, तर महायुतीला 12 जागा मिळाल्या आहेत. मात्र, अध्यक्ष निवडीच्या सभेसाठी 14 जणांच्या उपस्थितीचा कोरम महत्वपूर्ण असल्याने गोकुळच्या अध्यक्षपदाची निवडणूक होऊ शकली नाही. याचदरम्यान, गोकुळ दूध संघाच्या घडामोडीत आणखी एक लेटर बॉम्ब समोर आला आहे. तीन हजार कोटीहून अधिक वार्षिक उलाढाल असलेल्या सहकारी संस्थांवर दोन ऐवजी चार शासकीय सदस्य नेमा, असं मंत्री चंद्रकांत पाटील (Chandrakant Patil) यांचं पत्र व्हायरल होत आहे.

सदर पत्र चंद्रकांत पाटील यांनी 16 ऑक्टोबरला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (Devendra Fadnavis) यांना पत्र लिहल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे गोकुळ दूध संघाचे संचालक 33 करण्याचा प्रयत्न असल्याचा सवाल उपस्थित होत आहे. सहकारी संस्था अधिनियमात सुधारणा करण्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत प्रस्ताव आणण्याचीही विनंती चंद्रकांत पाटील यांनी देवेंद्र फडणवीसांना लिहिलेल्या पत्रात केली आहे. शासन नियुक्त संचालकांना व्यापक अधिकार दिले जावे, अशी देखील पत्रात मागणी केली आहे. गोकुळसाठी 18 ऑक्टोबरला मतदान झालं होतं. मात्र त्याआधीच चंद्रकांत पाटील यांनी सहकार कायद्यात बदल करण्यासंदर्भात लिहलेलं पत्र व्हायरल झाल्याने खळबळ उडाली आहे. आपल्या राज्यातील मोठ्या आकाराच्या



सहकारी संस्थांचे कामकाज आणि प्रशासकीय नियंत्रण अधिक मजबूत करण्यासाठी 'महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमामध्ये आवश्यक सुधारणा करण्याबाबत हे पत्र लिहीत आहे. सध्याच्या कायद्यातील तरतुदींनुसार, सहकारी संस्थांच्या संचालक मंडळावर 2 शासकीय नामनिर्देशित (शासनाने नियुक्त केलेले) आणि 2 संस्थेने नामनिर्देशित केलेले संचालक असतात. मध्यम व लहान आकाराच्या संस्थांसाठी ही व्यवस्था योग्य असली, तरी ज्या सहकारी संस्थांची वार्षिक उलाढाल रु. 3000 कोटींपेक्षा जास्त आहे, त्यांच्याकडे अवाढव्य प्रमाणावर सार्वजनिक निधी, पत्त आणि व्यावसायिक जबाबदाऱ्या असतात. अशा अवाढव्य आर्थिक उलाढाल व सार्वजनिक हित गुंतलेल्या मोठ्या संस्थांमध्ये अधिक पारदर्शकता, व्यावसायिक कौशल्य आणि प्रभावी प्रशासकीय नियंत्रण असणे अत्यंत आवश्यक आहे. यास्तव, रु. 3000 कोटींपेक्षा जास्त वार्षिक उलाढाल असलेल्या सहकारी संस्थांसाठी कायद्यात खालीलप्रमाणे सुधारणा सुचविण्यात येत आहेतः-१. शासकीय नामनिर्देशित संचालकः शासनाकडून नियुक्त केल्या जाणाऱ्या संचालकांची संख्या 2 वरून 4 करण्यात यावी.

२. संस्था नामनिर्देशित संचालकः संस्थेकडून नामनिर्देशित केल्या जाणाऱ्या संचालकांची संख्या 2 वरून 4 करण्यात यावी, या संतुलित वाढीमुळे अशा संस्थांना अधिक तज्ञ संचालकांचे मार्गदर्शन मिळेल, तसेच संस्थेच्या लोकशाही प्रतिनिधीत्वालाही अधिक व्यापक स्वरूप प्राप्त होईल. तरी कृपया, सहकार कायद्यात सदर दुरुस्ती होण्यासाठी आवश्यक प्रस्ताव आगामी मंत्रिमंडळाच्या बैठकीत येण्यासाठी योग्य ते निर्देश संबंधितांना व्हावेत अशी नम्र विनंती आहे, असं चंद्रकांत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे.राज्याचं लक्ष लागलेल्या कोल्हापूरमधील गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत (Gokul Election Result 2026) सतेज पाटलांच्या पॅनलनं बाजी मारली. भाजपनं खासदार धनंजय महाडिक, मंत्री हसन मुश्रीफ, मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह दिग्गजांची फौज मैदानात उतरवली होती. मात्र सतेज पाटलांच्या नेतृत्वाखील काँग्रेसप्रणित राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीनं कडवी लढत देत 13 विरुद्ध 12 असा अटीतटीच्या सामन्यात सतेज पाटलांच्या पॅनलचा (Kolhapur Gokul Election 2026) विजय झाला आहे.

६ महिन्यांपूर्वी सभासद झालेल्यांचे उमेदवारी अर्ज दाखल

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: जिल्हा बँक निवडणुकीत उमेदवारीसाठी संबंधित विकासो संस्थेत किमान २ वर्षे सक्रिय सभासद व संचालक असणे आवश्यक आहे. मात्र, अनेक राजकीय पदाधिकाऱ्यांनी अवघ्या ६ महिन्यांपूर्वी सभासदत्व मिळवून उमेदवारी अर्ज भरले आहेत. त्यातच अर्जासोबत जोडलेले संस्थांचे ऑडिट वर्गही संशयास्पद असल्याची चर्चा आहे. या दोन मूलभूत अटींची पूर्तता न झाल्यामुळे तब्बल ७० टक्के पदाधिकाऱ्यांचे अर्ज अपात्र ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अनिष्ट तफावतीतील संस्थांना बोगसपणे 'अ' आणि 'ब' वर्ग मिळवून देणे तसेच अवघ्या सहा महिन्यांपूर्वी सभासद होऊन अर्ज दाखल करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. सोमवारी होणाऱ्या छाननी प्रक्रियेत या दोन प्रमुख अटींची काटेकोर तपासणी होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. निवडणूक प्रक्रियेत केवळ सही, मतदार यादीतील क्रमांक किंवा स्पेलिंग यांसारख्या किरकोळ बाबींपुरते मर्यादित न राहता उमेदवाराने मूलभूत वैधानिक अटी पूर्ण केल्या आहेत की नाही, हे तपासणे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे कायदेशीर व नैतिक कर्तव्य आहे. मात्र' हरकत आली तरच पाहू' अशी सोयीस्कर भूमिका भूमिका अधिकाऱ्यांनी अधि घेऊ नये, अशी अपेक्षा सहकार क्षेत्रातील तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे.सहकारी संस्था



अधिनियम, १९६० च्या कलम २७ (३) नुसार प्राथमिक संस्थेच्या प्रतिनिधीचे मूळ सोसायटीत किमान २ वर्षे सलग सदस्यत्व अनिवार्य आहे. ऐनवेळी बोगस सदस्य करून सहकारावर ताबा मिळवणे रोखण्यासाठी ही तरतूद असून, सोसायटीच्या 'आय' रजिस्टरवरून ही तारीख तात्काळ स्पष्ट होते.'ब' : सहकार कायदा कलम ८१, कलम ७३ (कअ) आणि निवडणूक नियम २०१४ (नियम १०, ११, १२) नुसार विकासोचा मागील तीन वर्षांचा ऑडिट वर्ग 'अ' किंवा 'ब' असणे बंधनकारक आहे. बँकिंग नियमन दुरुस्ती कायद्यानुसार दिवाळखोरीच्या उंबरठ्यावरील 'क' व 'ड' वर्ग संस्थांचे प्रतिनिधी संचालक होऊ नयेत, असे रिझर्व्ह बँक व नाबार्डचे स्पष्ट निर्देश आहेत. निवडणूक नियम २०१४ मधील नियम २५ नुसार निवडणूक निर्णय अधिकारी हे अर्ध-न्यायिक प्राधिकारी असून, 'सुओ मोटो' (स्वतःहून) पडताळणी करणे त्यांचे वैधानिक कर्तव्य आहे. मात्र, 'पडताळणीसाठी आमच्याकडे याद्या उपलब्ध नसल्याने आक्षेप आल्यावरच चौकशी करू,' अशी भूमिका निवडणूक निर्णय अधिकारी मनोज चौधरी यांनी घेतल्याचे समजते. त्यामुळे नियमातील तरतुदी व प्रत्यक्ष प्रशासकीय कार्यपद्धती यातील विसंगती अधोरेखित होते. छाननीदरम्यान अधिकाऱ्यांनी नियमबाह्य अर्जांना अभय दिल्यास आणि न्याय न मिळाल्यास याविरोधात तातडीने उच्च न्यायालयात धाव घेण्याची तयारी काही हरकतदारांनी सुरू केली आहे.

‘बंगालचा बदला घेणार..’ ममता

दिल्ली: दिल्लीतील रामलीला मैदानावर आघाडीच्या रॅलीत पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी भाजपवर जोरदार निशाणा साधला. यावेळी त्यांनी भाजप आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर टीका केली. ‘बंगालमध्ये आमचा पराभव झालेला नाही, आम्हाला हरवण्यात आलं आहे. याचा बदला लोकशाही मार्गाने घेऊ,’ असा इशाराही त्यांनी दिला.आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची निषेधार्थ INआघाडीने दिल्लीतील रामलीला मैदानावर रॅली आयोजित केली होती. या सभेला देशभरातील विरोधी पक्षांचे नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भोकर स्टेट बँक दरोड्याचा मास्टरमाइंड निघाला फौजदार..!

जन सम्राट टाईम्स



जळगाव | प्रतिनिधी: तालुक्यातील भोकर येथे स्टेट बँकेच्या शाखेवर शनिवारी दुपारी सशस्त्र दरोडेखोरांनी धाडसी दरोडा टाकत संपूर्ण परिसरात खळबळ उडवून दिली. हेल्मेट आणि मास्क घालून दोन दुचाकींवरून आलेल्या चौघांनी बँकेत प्रवेश करत रोखपाल आणि शाखा व्यवस्थापकाला एअरगनचा धाक दाखवून लॉकरमधील सुमारे १५ लाखांची रोकड आणि अंदाजे ३५ कोटी रुपये किमतीचे सोने घेऊन दरोडेखोर पसार झाले. मात्र, घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने नाकाबंदी करून अवघ्या दोन तासांत चौघांना मुद्देमालासह अटक केली. या संपूर्ण दरोड्याचा सूत्रधार बडतर्फ पोलीस फौजदार (उपनिरीक्षक) असल्याचे तपासात समोर आले आहे. भोकर गावात भरवस्तीत स्टेट बँकेची शाखा आहे. शनिवारी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास दोन दुचाकींवरून चार जण बँकेच्या परिसरात दाखल झाले. चेहऱ्यावर मास्क आणि डोक्यावर हेल्मेट असल्याने त्यांची ओळख पटणे कठीण होते. बँकेत प्रवेश करताच त्यांनी रोखपाल आणि शाखा व्यवस्थापक जयेश राणे यांना लक्ष्य केले. दोघांच्या कानाला एअरगन लावून त्यांना लॉकर रूममध्ये जाण्यास भाग पाडण्यात आले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे बँकेतील कर्मचारी आणि उपस्थितांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.बँक कर्मचाऱ्यांनी दरोडेखोरांच्या आदेशाला विरोध करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी हवेत दोन राऊंड फायर केले. त्यामुळे बँकेतील कर्मचाऱ्यांमध्ये एकच घबराट पसरली. त्यानंतर दरोडेखोरांनी लॉकर रूममध्ये प्रवेश करून सोने आणि रोकड ताब्यात घेतली. बँकेतील १६ लॉकर्समधील सुमारे ३५ कोटींचे सोन्याचे दागिने तसेच सुमारे १५ लाख रुपयांची रोकड त्यांनी सहा बॅगांमध्ये भरली. नियोजनबद्ध पद्धतीने दरोडा टाकल्यानंतर चौघेही दुचाकींवरून घटनास्थळावरून पसार झाले.या दरोड्यात सुमारे ३५ कोटी रुपये किमतीचे सोने लुटण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. रोख रकमेसह एवढ्या मोठ्या प्रमाणात सोन्याची लूट झाल्याने पोलीस यंत्रणा तातडीने कामाला लागली. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. बँकेतील कर्मचारी आणि व्यवस्थापकांकडून घटनेची माहिती घेण्यात आली. लुटलेल्या मुद्देमालाचा तपशील तसेच दरोडेखोरांनी वापरलेल्या वाहनांची माहिती पोलिसांनी संकलित करण्यास सुरुवात केली. दरोडेखोर पसार झाल्याचे समजताच तालुका पोलिसांनी परिसरातील विविध रस्त्यांवर नाकाबंदी केली. ग्रामीण भागातील पोलीस पाटलांची मदत घेत संशयितांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात आले. विविध गावांमध्ये शोधमोहीम राबविण्यात आली. पोलिसांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवत संशयितांचा माग काढला. अखेर घटनेनंतर अवघ्या दोन तासांच्या आत चौघांनाही ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले. त्यांच्याकडून लुटलेला मुद्देमालही जप्त करण्यात आल्याची माहिती आहे. या तातडीच्या कारवाईमुळे मोठा अनर्थ टळला.या प्रकरणातील सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे दरोड्याचा कट कारागृहातच रचण्यात आल्याचे तपासात उघड झाले आहे. संशयित गजानन पवार हा चाळीसगाव तालुक्यातील कोदगाव येथे प्रेयसीच्या पतीच्या खूनप्रकरणी २०२४ पासून कारागृहात होता. त्याच कारागृहात २०२३ मध्ये जळगाव शहरातील कालिंकामाता मंदिर परिसरातील स्टेट बँकेवर दरोडा टाकल्याच्या प्रकरणातील बडतर्फ फौजदार शंकर जासकही होता. कारागृहात असतानाच दोघांमध्ये संपर्क वाढला आणि भोकर येथील बँक लुटण्याचा कट आखण्यात आल्याची माहिती तपासातून पुढे आली आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

गणना अर्जाच्या कायदेशीर आधारावर प्रश्नचिन्ह

अर्ज न भरल्यामुळे मतदाराचे नाव वगळणे चुकीचे असल्याचे न्या. ओक यांचे मत

जन सम्राट टाईम्स

पुणे । प्रतिनिधी: ‘मतदार विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेच्या (एसआयआर) प्रक्रियेत निवडणूक आयोगाने तयार केलेला गणना अर्ज (एन्युमरेशन फॉर्म) लोकप्रतिनिधित्व कायदा किंवा त्याअंतर्गत करण्यात आलेल्या नियमांमध्ये अस्तित्वात नाही. त्यामुळे हा अर्ज न भरल्याच्या कारणावरून पात्र मतदाराचे नाव मतदारयादीतून वगळणे कायदेशीरदृष्ट्या चुकीचे आहे,’ अशी स्पष्ट भूमिका सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती अभय ओक यांनी रविवारी मांडली. ‘एखादी व्यक्ती काही वर्षे मतदान करत असेल आणि त्या व्यक्तीच्या नागरिकत्वाबाबत किंवा मतदार म्हणूनच्या पात्रतेबाबत काही आक्षेप असतील तर केवळ अर्ज न भरल्याने त्या व्यक्तीचे नाव वगळता येणार नाही,’ असेही त्यांनी स्पष्ट केले. ‘एसआयआर’, निवडणूक आयोगाच्या मर्यादा, मतदारांना नोटीस देण्याची कायदेशीर प्रक्रिया आणि निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीमधील स्वायत्ततेचा मुद्यांबरोबरच माहिती अधिकार कायदा, पर्यावरण संरक्षण आणि विकासाच्या संकल्पनेचा परस्पर संबंधांबाबतही ओक यांनी सडतोड भूमिका मांडली.‘एसआयआर’ वरून होत असलेल्या पक्षीय राजकारणाबाबतही त्यांनी खंत व्यक्त करताना ‘लोकप्रतिनिधित्व कायदा १९५० किंवा त्याअंतर्गत १९६० मध्ये करण्यात आलेल्या मतदार नोंदणी नियमांमध्ये मतदार नोंदणी नियमांमध्ये या



विशिष्ट अर्जाचा उल्लेख नाही. निवडणूक आयोगाने स्वत: तयार केलेल्या या अर्जाला कायदेशीर आधार काय,’ अशी विचारणाही ओक यांनी केली.ते म्हणाले, ‘एसआयआर ही प्रक्रिया केवळ प्रशासकीय किंवा तांत्रिक बाब नाही. तिचा संबंध नागरिकांच्या मूलभूत लोकशाही अधिकाराशी आहे. एसआयआर प्रक्रियेला विरोध म्हणजे सत्ताधारी पक्षाला विरोध, असा अर्थ काढणे चुकीचे आहे. हा लढा कोणत्याही राजकीय पक्षाच्या विरोधात नाही. तर तो निवडणूक आयोगाने कायद्याच्या चौकटीत काम करण्यासाठीचा आहे. मतदाराचे नाव मतदारयादीतून वगळण्यासाठी प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. संबंधित मतदाराबाबत भारतीय नागरिक असल्याची शंका असेल, ती त्या मतदारसंघात राहत नसेल किंवा मतदार म्हणून अपात्र ठरत असेल तर, त्या व्यक्तीला ‘कारणे दाखवा’ नोटीस द्यावी लागते. मात्र, एसआयआर प्रक्रिया गणना अर्ज न भरल्यास मतदाराचे नाव प्रारूप मतदार यातीतून वगळले जाणे ही प्रक्रिया कायदेशीर तरतुदींशी विसंगत आहे. प्रारूप मतदारयादीतून नाव वगळल्यानंतर त्यात नव्याने नाव नोंदविण्यासाठी नमुना क्रमांक सहा हा अर्ज भरण्यास सांगितले जाते. मात्र, हा अर्ज प्रामुख्याने नव्याने मतदार नोंदणी करणाऱ्या मतदारांसाठी आहे.’निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेबाबतही ओक यांनी भाष्य केले. ‘सर्वोच्च न्यायालयाने कायदा होईपर्यंत पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते, सरन्यायाधीश यांचा समावेश असलेल्या समितीमार्फत निवडणूक आयुक्तांनी नियुक्ती करण्याचे सुचविले होते. मात्र, २०२३ मध्ये करण्यात आलेल्या कायद्यानुसार या समितीत सरन्यायाधीशांच्या जागी पंतप्रधानांनी नियुक्त केलेल्या केंद्रीय मंत्र्याचा समावेश करण्यात आला. या नियुक्तीला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. त्यामुळे सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त कोण आहेत, हा प्रश्न नसून, त्यांची नियुक्ती कोणत्या पद्धतीने झाली आहे हा मूळ प्रश्न आहे. निवडणूक आयोगाने निःपक्षपातीपणे काम करण्यासाठी नियुक्ती यंत्रणा स्वतंत्र असणे आवश्यक आहे,’ असेही ओक यांनी स्पष्ट केले.‘निवडणूक आयोगाचे अधिकार कमी करण्यासाठी कोणताही राजकीय पक्ष त्याला अपवाद नाही.

ऊसदरासाठी स्वाभिमानीचा दुहेरी एल्गार!

राजू शेट्टी किणी टोलनाक्यावर आंदोलनाचं नेतृत्व करणार

जन सम्राट टाईम्स

टिटवेवाडी। प्रतिनिधी : ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या घामाला योग्य दाम मिळावा, यंदाच्या हंगामातील पहिली उचल प्रतिटन ४५०० रुपये जाहीर करावी आणि शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी त्यांना मिळावे, या मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आता आरपारच्या संघर्षाची भूमिका घेतली आहे. मंगळवार, दि. ३ नोव्हेंबर रोजी पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर एकाच दिवशी दोन ठिकाणी बेमुदत चक्का जाम आंदोलन करण्यात येणार आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांतील शेतकरी किणी टोलनाका येथे आंदोलन करणार असून, सातारा जिल्ह्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ऊस उत्पादक शेतकरी नागठाणे (ता. सातारा) येथील उरमोडी नदी पुलाशेजारी महामार्गावर आंदोलन करणार आहेत. त्यामुळे ऊसदराच्या प्रश्नावर संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रात आंदोलनाची धग अधिक तीव्र होणार आहे.गेल्या अनेक दिवसांपासून ऊसदराच्या प्रश्नावर कारखानदारांना चर्चेतून मार्ग काढण्याची संधी देण्यात आली. मात्र, शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चाचा विचार करून प्रतिटन ४५०० रुपयांची पहिली उचल जाहीर करण्याबाबत अपेक्षित सकारात्मक भूमिका घेतली जात नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. त्यामुळे सातारा जिल्ह्यातील खटाव, कराड आणि कोरेगाव तालुक्यांत विविध ठिकाणी साखर कारखान्यांकडे जाणारी ऊस वाहतूक रोखण्यात आली आहे. गेल्या दोन दिवसांपासून शेतकरी आणि संघटनेचे कार्यकर्ते रस्त्यावरच मुक्काम करून आंदोलनाची धुरा



सांभाळत आहेत. आता या संघर्षाची पुढील पायरी म्हणून नागठाणे येथे बेमुदत चक्का जाम आंदोलन पुकारण्यात आले आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू शेट्टी हे कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांतील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सोबत घेऊन किणी टोलनाका येथे आंदोलनाचे नेतृत्व करणार आहेत. त्याचवेळी सातारा जिल्ह्यातील स्वाभिमानीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ऊस उत्पादक शेतकरी एकजुटीने नागठाणे येथील उरमोडी नदी पुलाशेजारी महामार्गावर चक्का जाम आंदोलन करणार आहेत. त्यामुळे पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर दोन ठिकाणी एकाच वेळी शेतकऱ्यांच्या हक्काचा आवाज बुलंद होणार आहे. केवळ ऊसदराचा प्रश्नच नव्हे, तर कृष्णा, उरमोडी आणि तारळी नदीच्या पाण्याचा प्रश्नही या आंदोलनात प्रखरपणे उपस्थित केला जाणार आहे. धरणांमध्ये पाणीसाठा उपलब्ध असताना शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी देण्याची वेळ आली की नियम, कायदे आणि कालवा सल्लागार समितीच्या बैठकांचे कारण पुढे केले जाते. मात्र, शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी अन्यत्र वळविले जात असल्याचा गंभीर आरोप संघटनेने केला आहे. शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी पळविताना नियमांची अडचण येत नाही; मग तेच पाणी शेतकऱ्यांना देताना कायद्याचे दाखले का दिले जातात? अधिकार आणि सत्तेचा गैरवापर करून कृत्रिम पाणीटंचाई निर्माण करायची, शेतकऱ्यांना पाण्याची भीती दाखवायची आणि त्यांचा ऊस कमी दरात कारखान्यांकडे वळवायचा, हा प्रकार आता खपवून घेतला जाणार नाही, अशी आक्रमक भूमिका संघटनेने घेतली आहे. कृष्णा, उरमोडी आणि तारळी नदीतून शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी सोडावे, ही मागणीही नागठाणे येथील आंदोलनातून लावून धरली जाणार आहे.ऊस उत्पादक शेतकरी जगला तरच गावातील बाजारपेठ, व्यापारी, दुकानदार, वाहतूकदार आणि ग्रामीण अर्थव्यवस्था टिकणार आहे.त्यामुळे सातारा जिल्ह्यातील सर्व शेतकरी, व्यापारी, दुकानदार, तरुण आणि सर्वसामान्य नागरिकांनी ३ नोव्हेंबर रोजी नागठाणे येथे होणाऱ्या आंदोलनात एक दिवस शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. ऊसाला प्रतिटन ४५०० रुपये पहिली उचल आणि शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी मिळविण्यासाठी आता निर्णायक संघर्षाची वेळ आली आहे. कोल्हापूर-सांगलीतील शेतकरी किणी टोलनाक्यावर, तर सातारा जिल्ह्यातील शेतकरी नागठाणे येथे एकाच वेळी रस्त्यावर उतरून आपली एकजूट दाखवणार आहेत. शेतकऱ्यांच्या घामाची किंमत आणि पाण्याचा हक्क मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहणार, असा ठाम निर्धार स्वाभिमानी शेतकरी संघटनेने व्यक्त केला आहे.

उन्हाळ्यात वर्ध्याची तहान कशी भागणार?

धरणांत फक्त 'इतकाच' पाणीसाठा, वर्धेकरांनो, आतापासूनच पाणी जपून वापरा

जन सम्राट टाईम्स

वर्धा । प्रतिनिधी : यंदा पावसाळ्याच्या दिवसांत जिल्ह्यात अपेक्षेपेक्षा कमी पर्जन्यमान झाल्याचा परिणाम जलाशयांमधील पाणीसाठ्यावर झाला आहे. जिल्ह्यातील ११ मोठ्या व मध्यम जलाशयांत केवळ ६७ टक्के उपयुक्त जलसाठा उपलब्ध आहे. गतवर्षी ऑक्टोबर अखेरपर्यंत सर्वच जलाशय १०० टक्के भरलेले असताना यंदा मात्र पाणीसाठ्याची स्थिती चिंताजनक बनली आहे. त्यामुळे यंदा उन्हाळ्यापूर्वीच जिल्ह्याला जलसंकटाचा सामना करावा लागण्याची भीती व्यक्त होत आहे. वर्धा जिल्ह्यात बोर, निम्न वर्धा, धाम, पोथरा, पंचधारा, डोंगरगाव, मदन, मदन उन्नई, लाल नाला, वर्धा कार नदी आणि सुकळी लघु असे एकूण ११ जलप्रकल्प आहे. या जलाशयांमधील पाणी शेती, पिण्याच्या पाण्याची गरज तसेच वन्यप्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेसाठी महत्त्वपूर्ण ठरते. मात्र, यंदा पावसाने अपेक्षित साथ न दिल्याने अनेक प्रकल्पांमध्ये पुरेसा जलसाठा निर्माण होऊ शकलेला नाही.उपलब्ध आकडेवारीनुसार, बोर प्रकल्पात ६४.४४ टक्के, निम्न वर्धा प्रकल्पात ७०.२१ टक्के, धाम प्रकल्पात ६८.०७ टक्के, पोथरा



प्रकल्पात ८०.३१ टक्के, पंचधारा प्रकल्पात ३६.८० टक्के, डोंगरगाव प्रकल्पात ५७.५५ टक्के, मदन प्रकल्पात २०.७० टक्के, मदन उन्नई धरणात १७.९३ टक्के, लाल नाला प्रकल्पात ७८.५४ टक्के, वर्धा कार नदी प्रकल्पात ६०.५८ टक्के, तर सुकळी लघु प्रकल्पात ५४.९२ टक्के उपयुक्त जलसाठा शिल्लक आहे. महाकाळी येथील धाम प्रकल्पाचे महत्त्व अधिक आहे. या प्रकल्पातून वर्धा शहरासह पिपरी मेघे आणि परिसरातील १४ गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. मात्र, या प्रकल्पातही अपेक्षित जलसाठा नसल्याने आगामी काळातील पाणी पुरवठ्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. गतवर्षी सर्व अकराही जलाशयांमध्ये ऑक्टोबर अखेरपर्यंत १०० टक्के उपयुक्त जलसाठा होता. यंदाच्या स्थितीशी तुलना करता पर्जन्यमानातील तूट किती परिणामकारक ठरली, हे आकडेवारीवरून स्पष्ट होते. जलाशयांत उपलब्ध जलसाठा नाममात्र असल्याने प्रशासनासह नागरिकांनीही आतापासून पाणी वापराबाबत नियोजन करणे आवश्यक आहे. पाण्याचा अपव्यय टाळणे, उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि जलसंधारणाच्या उपाययोजनांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. अन्यथा उन्हाळ्यात पाणी टंचाईचे संकट अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यंदा पावसाळ्याच्या दिवसांत जिल्ह्यात अपेक्षेपेक्षा कमी पर्जन्यमान झाल्याचा परिणाम जलाशयांमधील पाणीसाठ्यावर झाला आहे. मध्यम जलाशयांत केवळ ६७ टक्के उपयुक्त जलसाठा उपलब्ध आहे. गतवर्षी ऑक्टोबर अखेरपर्यंत सर्वच जलाशय १०० टक्के भरलेले असताना यंदा मात्र पाणीसाठ्याची स्थिती चिंताजनक बनली आहे. त्यामुळे यंदा उन्हाळ्यापूर्वीच जिल्ह्याला जलसंकटाचा सामना करावा लागण्याची भीती व्यक्त होत आहे. वर्धा जिल्ह्यात बोर, निम्न वर्धा, धाम, पोथरा, पंचधारा, डोंगरगाव, मदन, मदन उन्नई, लाल नाला, वर्धा कार नदी आणि सुकळी लघु असे एकूण ११ जलप्रकल्प आहे. या जलाशयांमधील पाणी शेती, पिण्याच्या पाण्याची गरज तसेच वन्यप्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेसाठी महत्त्वपूर्ण ठरते. मात्र, यंदा पावसाने अपेक्षित साथ न दिल्याने अनेक प्रकल्पांमध्ये पुरेसा जलसाठा निर्माण होऊ शकलेला नाही.उपलब्ध आकडेवारीनुसार, बोर प्रकल्पात ६४.४४ टक्के, निम्न वर्धा प्रकल्पात ७०.२१ टक्के, धाम प्रकल्पात ६८.०७ टक्के, पोथरा प्रकल्पात ८०.३१ टक्के, पंचधारा प्रकल्पात ३६.८० टक्के, डोंगरगाव प्रकल्पात ५७.५५ टक्के, मदन प्रकल्पात २०.७० टक्के, मदन उन्नई धरणात १७.९३ टक्के, लाल नाला प्रकल्पात ७८.५४ टक्के, वर्धा कार नदी प्रकल्पात ६०.५८ टक्के, तर सुकळी लघु प्रकल्पात ५४.९२ टक्के उपयुक्त जलसाठा शिल्लक आहे. महाकाळी येथील धाम प्रकल्पाचे महत्त्व अधिक आहे. या प्रकल्पातून वर्धा शहरासह पिपरी मेघे आणि परिसरातील १४ गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. मात्र, या प्रकल्पातही अपेक्षित जलसाठा नसल्याने आगामी काळातील पाणी पुरवठ्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

पहूरमध्ये शेततळ्यात बुडून ५५ वर्षीय शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू!

जन सम्राट टाईम्स

पहूर, ता. जामनेर | प्रतिनिधी : पहूर येथे शेततळ्यातील पाण्यात बुडून ५५ वर्षीय शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. १ नोव्हेंबर २०२६) सकाळी सहाच्या सुमारास उघडकीस आली. अमृत त्र्यंबक वानखेडे असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. या घटनेमुळे पहूर परिसरात शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अमृत त्र्यंबक वानखेडे हे रविवारी सकाळी नेहमीप्रमाणे शेतात गेले होते. यावेळी शेतातील शेततळ्यातील पाण्यात बुडून त्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. सकाळी सहाच्या सुमारास ही बाब निदर्शनास येताच परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस उपनिरीक्षक प्रवीण दातरे यांच्यासह पोलीस कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. शेततळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी असल्याने मृतदेह बाहेर काढणे आव्हानात्मक ठरले. नागरिकांनी दोराच्या साहाय्याने अथक प्रयत्न केले. अखेर स्थानिक नागरिकांच्या मदतीने अमृत वानखेडे यांचा मृतदेह शेततळ्यातून बाहेर काढण्यात आला. त्यानंतर पुढील वैद्यकीय प्रक्रियेसाठी मृतदेह पहूर ग्रामीण रुग्णालयात नेण्यात



आला. पहूर ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. भूषण पाटील यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. त्यानंतर मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या खबरीवरून पहूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेचा पुढील तपास राहुल पाटील व त्यांचे सहकारी करीत आहेत. पहूर येथे शेततळ्यातील पाण्यात बुडून ५५ वर्षीय शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. १ नोव्हेंबर २०२६) सकाळी सहाच्या सुमारास उघडकीस आली. अमृत त्र्यंबक वानखेडे असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. या घटनेमुळे पहूर परिसरात शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अमृत त्र्यंबक वानखेडे हे रविवारी सकाळी नेहमीप्रमाणे शेतात गेले होते. यावेळी शेतातील शेततळ्यातील पाण्यात बुडून त्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली.

वरणगावात गोळीबाराचा थरार! ; लोखंडी रॉडने डोक्यावर वार, तरुणाची प्रकृती चिंताजनक

जन सम्राट टाईम्स

वरणगाव। प्रतिनिधी: वरणगाव येथील फुलगाव उड्डाणपुलाखाली रविवारी (१ नोव्हेंबर) रात्री सुमारे सात वाजेच्या सुमारास गोळीबाराची थरारक घटना घडली. मुक्ताईनगर येथील २५ वर्षीय तरुणावर दुचाकीवरून आलेल्या तिघांनी गोळीबार करून लोखंडी रॉडने डोक्यावर वार केल्याचा प्रकार समोर आला आहे. या हल्ल्यात सरफराज सय्यद बशीर सय्यद (वय २५, रा. मुक्ताईनगर) गंभीर जखमी झाला असून, त्याला पुढील उपचारासाठी जळगाव जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले आहे. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची प्राथमिक माहिती आहे. दुचाकीवरून आलेल्या तिघांचा अचानक हल्ला मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सरफराज सय्यद हा फुलगाव उड्डाणपुलाखाली एमएच ७५३१ क्रमांकाच्या दुचाकीजवळ उभा होता. यावेळी मोटारसायकलवरून आलेल्या तीन जणांनी त्याच्यावर हल्ला केला. हल्लेखोरांनी सरफराजच्या दिशेने दोन ते तीन गोळ्या झाडल्या. त्यानंतर



लोखंडी रॉडने त्याच्या डोक्यावर वार करून घटनास्थळावरून पलायन केले. डंपर चालवून करीत होता कुटुंबाचा उदरनिर्वाह सरफराज सय्यद हा डंपर चालक म्हणून काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असल्याची माहिती मिळाली आहे. कामानिमित्त तो वरणगाव परिसरात आला असताना त्याच्यावर हा हल्ला झाल्याचे सांगितले जात आहे. गोळीबारात गंभीर जखमी झालेल्या सरफराजला तातडीने उपचारासाठी हलविण्यात आले. हल्ल्यामागील कारण अद्याप अस्पष्ट सरफराजवर गोळीबार कोणी आणि नेमक्या कोणत्या कारणातून केला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. वैयक्तिक वाद, पूर्ववैमनस्य किंवा अन्य काही कारणातून हा हल्ला झाला का, याचा तपास महत्त्वाचा ठरणार आहे. हल्ल्यामागील नेमके कारण पोलिसांच्या तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. फरार संशयितांचा शोध घेण्याचे आव्हान घटनेनंतर तिन्ही संशयित हल्लेखोर फरार झाल्याची प्राथमिक माहिती आहे. तिघांनी गोळीबार करून लोखंडी रॉडने डोक्यावर वार केल्याचा प्रकार समोर आला आहे. या हल्ल्यात सरफराज सय्यद बशीर सय्यद गंभीर जखमी झाला असून, त्याला पुढील उपचारासाठी जळगाव जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले आहे.दुचाकीवरून आलेल्या तिघांचा अचानक हल्ला मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सरफराज सय्यद हा फुलगाव उड्डाणपुलाखाली एमएच ७५३१ क्रमांकाच्या दुचाकीजवळ उभा होता. यावेळी मोटारसायकलवरून आलेल्या तीन जणांनी त्याच्यावर हल्ला केला.

विकासकामांच्या अभावामुळे माळेगाव पिंपरीतील ग्रामस्थ आक्रमक!

आठ दिवसांत कामे सुरू न झाल्यास ग्रामपंचायतीला कुलूप ठोकून धरणे आंदोलनाचा इशारा

जन सम्राट टाईम्स

माळेगाव पिंपरी। प्रतिनिधी : ग्रुप ग्रामपंचायत माळेगाव पिंपरी, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर अंतर्गत येणाऱ्या जनरल व दलित वस्त्यांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून मूलभूत विकासकामे झाली नसल्याचा आरोप करीत ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. रस्ते, गटारी, पाणीपुरवठा आणि युवकांसाठी आवश्यक सुविधांच्या मागण्यांसाठी ग्रामस्थांनी दि. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लेखी निवेदन दिले आहे. आठ दिवसांत मागण्यांवर कार्यवाही न झाल्यास ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप ठोकून धरणे आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. रस्ते, गटारी आणि पाणीपुरवठ्याचा प्रश्न ऐरणीवर ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात जनरल व दलित वस्तीतील मुख्य रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्याची मागणी केली आहे. पावसाळ्यात रस्त्यांवर चिखल साचत असल्याने नागरिकांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागतो. सांडपाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी पक्क्या गटारी व नाल्यांची बांधणी करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.



जल जीवन मिशनअंतर्गत प्रत्येक घराला स्वतंत्र नळजोडणी देऊन नियमित पाणीपुरवठा करावा, तसेच गावातील प्रत्येक चौकात ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी सिमेंटची बाकडी बसवावीत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. युवकांसाठी वाचनालय आणि व्यायामशाळेची मागणी गावातील युवकांना स्पर्धा परीक्षांची तयारी करता यावी, यासाठी आवश्यक पुस्तकांसह सुसज्ज सार्वजनिक वाचनालय मंजूर करावे. तसेच युवकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ओपन जिम किंवा व्यायामशाळा उभारावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. निकृष्ट विकासकामांच्या चौकशीची मागणी ग्रामपंचायत हद्दीत ठेकेदार अविनाश पाटील यांनी केलेली काही विकासकामे मंजूर अंदाजपत्रकानुसार झालेली नसून त्यांचा दर्जा निकृष्ट असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या कामांची तांत्रिक तपासणी करून चौकशी करावी आणि संबंधित ठेकेदाराला यापुढील कामे देऊ नयेत, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. या आरोपांची प्रशासनाने निष्पक्ष चौकशी करण्याची अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. आठ दिवसांची मुदत; अन्यथा ग्रामपंचायतीला कुलूप या निवेदनाची प्रत गटविकास अधिकारी, पंचायत समिती सोयगाव, समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद तसेच सरपंच व ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत माळेगाव पिंपरी यांना देण्यात आली आहे. दिलेल्या मागण्यांवर आठ दिवसांच्या आत ठोस कार्यवाही न झाल्यास ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप ठोकून धरणे आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असा स्पष्ट इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

संपादकीय

भीमाशंकरवरचा घाव विसरता येणारा नाही...

आधी तपोवन, आता भीमाशंकर... महाराष्ट्राच्या फुप्फुसांवर घाव घातला गेला. राज्याबाहेरचे धंदेवाले आणि राज्यातले पाताळयंत्री राजकारणी यांनी शेकडो वर्षांच्या जीवसृष्टीवर कुऱ्हाड चालवली. रातोरात झाडांच्या शंभर पिढ्यांची कत्तल झाली. पण या कानाची त्या कानाला जाग लागली नाही. गुपचूप गुपचूप. यांच्या सगळ्या कारवाया पहाटेपूर्वीच, अंधारात.

उद्योगपतीची कुऱ्हाड मोठी आहे. पण वाईट या गोष्टीचं वाटतं की या कुऱ्हाडीचा दांडा त्या प्राचीन म्हणीसारखाच गोतास काळ ठरलेला – स्थानिक समाजातला आहे. या स्थानिक समाजाचा निवडून दिलेला लोकप्रतिनिधी , इथून पुढे गेलेला राजकारणीच या उद्योगपतींच्या सृष्टीविध्वंसक उद्योगात मोलाची मदत करतो आहे. या संपूर्ण विध्वंसाचा चेहरा असलेला मनुष्य पिडीत राज्याचा मुखिया आहे. जी 'क्लीन एनर्जी' ऊर्फ स्वच्छ ऊर्जा मिळवण्यासाठी ही तोडातोड चालवली आहे , तो स्वच्छ वीज निर्मिती प्रकल्प हाच मुळी एक महाभ्रष्ट , अभद्र आणि अस्वच्छ मानसिकतेतून उद्भवलेला उद्योग आहे. सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा हा आहे की कोणाचंही उचलून कोणालाही देऊन टाकायचं हे स्थानिक जनतेनं यापुढे खपवून घेता नये. आमची भूमी आमचे नैसर्गिक स्रोत, आमचं पाणी दुसऱ्यांना देण्याचा अधिकार आम्ही तुम्हाला दिलेला नाही.इथल्या जनतेनं तुम्हाला स्वतःची कामं करण्यासाठी पूर्णवेळ कामाला ठेवलं आहे... चांगला गलेलठ्ठ पगार देऊन. तुम्हाला मालक केलेलं नाही. इथल्या जल, स्थल, तरु, तृण, काष्ठ, पाषाण, निधी आणि निक्षेपाचे अविछिन्न मक्तेदार असल्यासारखे वागू नका.महाराष्ट्राची परिस्थितिकी (इकॉलॉजी) आणि इथल्या विविध जैव परिसंस्था (इकोसिस्टिम) म्हणजे या प्रदेशाची श्रीमंती आहे. महाराष्ट्रातल्या परिसंस्थेचा विध्वंस केला तर इथले पक्षी प्राणी आणि संपूर्ण जीवसृष्टी नाहीशी होईल. आमच्या या समृद्ध जैवविविधतेनं आम्हाला उत्तुंग इतिहास दिला. सर्वांगसुंदर आणि सर्वसमावेशक भूगोल दिला. इथे शेतकरी आहेत, कातकरी आहेत. मच्छिमार आहेत, व्यापारी आहेत. समुद्र, बंदरं, जंगलं आणि विस्तीर्ण माळरानं यांनी या प्रदेशातल्या माणसाला उपजीविकेची विविध साधनं दिली. बंदरांनी व्यापार प्रगतीपथावर नेला; समुद्रानं मच्छीमारांना तारलं; जंगलांनी आदिवासी जमातींना पोसलं; पठारी प्रदेश शेतकऱ्यांचा आणि पशुपालकांचा पोशिंदा झाला.महाराष्ट्र म्हटलं की सुंदर समुद्रकिनारा, औषधी आणि अन्न पुरवणारी विस्तीर्ण जंगलं, प्राचीन वृक्षराजींनी बहरलेला पश्चिम घाट, जीवनदायिनी नद्यांचे उगम असलेल्या सह्याद्रीच्या रांगा ...हे सगळं निसर्गदत्त साम्राज्य नजरेसमोर येतं. अपरान्त आणि गोमंचल म्हणून प्राचीन काळापासून ओळख असलेले हे प्रदेश, ही भूमी ही आज आमची ओळख आहे. इथल्या जमिनीच्या पोटात खनिजांचे साठे आहेत... आमचं जीव- भौतिक-रसायनशास्त्र आम्हाला जन्मानं मिळालं आहे. ते हिरावून घेण्याचा अधिकार कुणालाही नाही. हे साम्राज्य उध्वस्त करुन इथे कसलाही विकास करू नका ही भूमिका त्यामुळे रास्त आहे. इथली अन्नसाखळी (जैवसाखळी) तुटली तर इथल्या मानवी जीवनावर त्याचा सरळ परिणाम होणार आहे. इथल्या जंगलांनी झाकलेल्या ओल्या जमिनी उघड्या झाल्या तर त्याचा परिणाम पाण्याचे स्रोत आणि पिकांचं चक्र यावर होणार आहे.पुण्या-मुंबईसारख्या सोसायटीतल्या लोकांना न विचारता एखादा भटका सार्वजनिक कुत्रा कोणी उचलून नेला तर त्याच्यावर कारवाई होते. मग सार्वजनिक नैसर्गिक मालमत्तेचं नुकसान करणाऱ्या या उद्योगपतींवर कारवाई कधी होणार? आम्हाला आमचं अपरान्त तसंच गोमंचल वाचवायचं आहे. तेवढंच कशाला ? संपूर्ण आर्यावर्त उखडण्याचा डाव उधळायचा आहे. अपरान्त, गोमंचल (दमणगंगा नदीपासून गंगवल्ली नदीपर्यंतचा किनारी प्रदेश) आणि पौराणिक काळात ज्याचा 'सप्त कोकण' असा उल्लेख आढळतो तो प्रदेश मुळात कुऱ्हाडवाल्यानेच निर्माण केला आहे.... परशुरामांपेक्षा तुमची कुऱ्हाड नक्कीच मोठी नाही. या सप्तकोकणाला हात घालू नका... परिमाण वाईट होतील.भीमाशंकर अभयारण्य हे मुंबई पुण्याचं फुप्फुस आहे. दमणगंगा ते गंगवल्ली नदीच्या दरम्यान असलेल्या कंकणाकृती प्रदेशाला कोकण म्हणतात. यात प्रदेशाची लांबीरुंदी आणि कुठपासून कुठपर्यंत या बाबत मतभेद असू शकतात.

जब दीप जले आना'च्या सुरांनी रंगली दिवाळी संध्या

जन सम्राट टाईम्स

मुंबई | प्रतिनिधी : शिवाजी पार्क जिमखान्यातर्फे आयोजित 'जब दीप जले आना' या दिवाळी संध्या या विशेष संगीत मैफलीत हिंदी आणि मराठी सदाबहार गीतांचा सुरेल नजराणा रसिकांना अनुभवायला मिळाला. शनिवार, 31 ऑक्टोबर रोजी दादर येथील शिवाजी पार्क जिमखान्याच्या परिसरात हा कार्यक्रम पार पडला. तब्बल तीन तास रंगलेल्या या मैफलीला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या संगीत मैफलीत सुप्रसिद्ध गायक नचिकेत देसाई, माधुरी करमरकर आणि केतकी भावे-जोशी यांनी लोकप्रिय हिंदी आणि मराठी गीते सादर केली. त्यांच्या सुरेल सादरीकरणाने उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले. जुन्या गाण्यांच्या आठवणींना उजाळा देणाऱ्या या संगीतप्रवासाचा रसिकांनी मनमुराद आनंद लुटला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन, सुयोग्य व्यवस्था आणि एकूणच आयोजनाबद्दल उपस्थितांनी या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे दिग्दर्शक अशोक पत्की यांचा करण्यात आलेला विशेष सत्कार. शिवाजी पार्क जिमखान्याचे सदस्य असलेल्या पत्की यांचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. मराठी चित्रपटसृष्टी, नाट्यसृष्टी, दूरचित्रवाणी आणि जाहिरात क्षेत्रातील संगीतासाठी अशोक पत्की यांनी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

सातारा जिल्हा बँकेच्या निवडणुकीत महायुतीतच संघर्ष

फलटणमध्ये कट्टर विरोधकांचे स्मितहास्य ; निकाल ठरवणार जिल्ह्याचे नवे राजकीय समीकरण

जन सम्राट टाईम्स

सातारा । प्रतिनिधी: सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत विक्रमी ९७.९२ टक्के मतदान झाल्याने जिल्ह्याच्या राजकारणातील सत्तासमीकरणांची कसोटी लागली आहे. वरकरणी महायुती म्हणून निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्या भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवसेनेसमोर प्रत्यक्षात मात्र वर्चस्वाची लढाई उभी ठाकली आहे. १२ जागांवर जास्तीत जास्त संचालक निवडून आणण्यासाठी भाजप आणि राष्ट्रवादीने आपली संपूर्ण ताकद पणाला लावली आहे. मतदानादरम्यान खंडाळ्यात समर्थकांमध्ये झालेली हाणामारी, फलटणमध्ये रामराजे आणि रणजितसिंह नाईक निंबाळकर यांची झालेली अनपेक्षित भेट, तर माण-पाटणमधील पारंपरिक राजकीय संघर्षाने या निवडणुकीचा रंग अधिकच गडद केला आहे. त्यामुळे जिल्हा बँकेचा निकाल केवळ संचालक निवडीपुरता मर्यादित न राहता जिल्ह्यातील राजकीय वर्चस्वाचा नवा अध्याय लिहिणार आहे.खंडाळा तालुका सोसायटी मतदारसंघातील अवघ्या ५० मतांची लढाई या निवडणुकीतील सर्वाधिक लक्षवेधी ठरली. राष्ट्रवादीचे अजय भोसले, भाजपचे अनिरुद्ध गाढवे आणि अपक्ष ॲड. शामराव गाढवे यांच्यात तिरंगी लढत झाली. प्रत्येक मत विजयासाठी निर्णायक असल्याने दोन्ही पक्षांनी मतांची जुळवाजुळव आणि मतदारांची एकजूट राखण्यासाठी विशेष व्यूहरचना आखली होती. राष्ट्रवादीने मतदारांना सहलीवर पाठवून आपली मते सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला, तर भाजपनेही विजयासाठी जोरदार मोर्चेबांधणी केली.मतदानाच्या दिवशी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी सकाळी अकराच्या सुमारास मतदान



केंद्रावर उपस्थिती लावत आपल्या मतदारांना मतदानासाठी आणले. त्यानंतर ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनीही मतदारांसह केंद्र परिसरात हजेरी लावली. भाजपच्या मतदारांचा वाहनांचा ताफा दाखल झाल्यानंतर गर्दीतून 'चोर-चोर' अशी आरोळी उठली आणि दोन्ही गटांमध्ये शाब्दिक वाद सुरू झाला. त्याचे रूपांतर धक्काबुक्की आणि हाणामारीत झाले. काही काळ मतदान केंद्र परिसरात तणाव निर्माण झाला. मात्र, पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप केल्याने मोठा अनर्थ टळला. पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या निवडणुकीत खासदार उदयनराजे भोसले आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले हे प्रत्यक्ष निवडणूक आखाड्याबाहेर असले, तरी सातारा तालुक्यातील राजकीय घडामोडींवर त्यांचे बारीक लक्ष होते. महायुतीच्या जागावाटपात अधिक जागांचा त्याग करून मुख्यमंत्र्यांना दिलेला शब्द पाळल्याचे शिवेंद्रसिंहराजे यांनी स्पष्ट केले आहे. मात्र, दोन्ही राजांच्या समर्थकांची मतदान केंद्र परिसरातील उपस्थिती आणि पडद्यामागील हालचाली पाहता जिल्हा बँकेच्या सत्तासमीकरणात त्यांचा रिमोट कंट्रोल महत्त्वाचा ठरणार, हे स्पष्ट झाले आहे. फलटणमध्ये पारंपरिक राजकीय विरोधक रामराजे नाईक निंबाळकर आणि खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर मतदानाच्या निमित्ताने आमनेसामने आले. राजकीय संघर्षासाठी ओळखल्या जाणाऱ्या या दोन नेत्यांनी एकमेकांकडे पाहून स्मितहास्य केले आणि नमस्काराची देवाणघेवाण केली. फलटणच्या राजकारणात हा दुर्मिळ क्षण चर्चेचा विषय ठरला. काही दिवसांपूर्वी कराडमध्ये रामराजे आणि जयकुमार गोरे एकाच व्यासपीठावर शेजारी बसून दिलखुलास गप्पा मारताना दिसले होते. नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. रामराजेंनी राजकीय विरोधकांशी जुळवून घेण्याची भूमिका घेतल्यास त्याचे जिल्ह्याच्या राजकारणावर काय परिणाम होतील, याबाबतही तर्कवितर्क लढवले जात आहेततरी माण तालुक्यात ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे विरुद्ध शेखर गोरे आणि मनोज पोळ, अशी प्रतिष्ठेची लढत रंगली आहे. त्यामुळे येथे भाजप विरुद्ध राष्ट्रवादी असा संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. पाटणमध्ये पालकमंत्री शंभूराज देसाई आणि सत्यजितसिंह पाटणकर यांच्यातील पारंपरिक राजकीय संघर्षानेही निवडणुकीत रंग भरला आहे. महाबळेश्वरमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ताकद संजय मोरे यांच्या पाठीशी असल्याची चर्चा असून त्यांच्यासमोर सोनाली राजपुरे यांचे आव्हान आहे. अनुसूचित जमाती आणि भटक्या प्रवर्गातील जागांवरही मोठी चुरस निर्माण झाली आहे. विक्रमी मतदानामुळे सर्वच राजकीय पक्षांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. भाजपने जिल्ह्यात व्यापक मोर्चेबांधणी केली असली, तरी राष्ट्रवादी काँग्रेस शिवसेनेनेही आपली राजकीय ताकद दाखवून दिली आहे. बँकेत शिवसेनेचा प्रवेश कितपत प्रभावी ठरणार, भाजपचे संख्याबळ वाढणार की राष्ट्रवादी आपले वर्चस्व कायम ठेवणार, याची उत्सुकता आहे.

माण-पाटणमध्ये महायुतीचीच कसोटी

महायुती म्हणून निवडणूक लढवली जात असल्याचा दावा केला जात असला, तरी माण तालुक्यात ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे विरुद्ध शेखर गोरे आणि मनोज पोळ, अशी प्रतिष्ठेची लढत रंगली आहे. त्यामुळे येथे भाजप विरुद्ध राष्ट्रवादी असा संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. पाटणमध्ये पालकमंत्री शंभूराज देसाई आणि सत्यजितसिंह पाटणकर यांच्यातील पारंपरिक राजकीय संघर्षानेही निवडणुकीत रंग भरला आहे. महाबळेश्वरमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ताकद संजय मोरे यांच्या पाठीशी असल्याची चर्चा असून त्यांच्यासमोर सोनाली राजपुरे यांचे आव्हान आहे. अनुसूचित जमाती आणि भटक्या प्रवर्गातील जागांवरही मोठी चुरस निर्माण झाली आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

जुन्या वादातून तरुणाला ट्रॅक्टरने चिरडण्याचा प्रयत्न!



जन सम्राट टाईम्स

शिरपूर, धुळे । प्रतिनिधी जुन्या वादातून एका २७ वर्षीय तरुणाला ट्रॅक्टरने चिरडून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना शिरपूर तालुक्यातील गिधाडे येथे घडली. एवढेच नव्हे, तर जखमी तरुणाला उपचारासाठी शिरपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता त्याच्या नातेवाईकांनाही मारहाण करण्यात आल्याचा आरोप आहे. या घटनेचा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

या प्रकरणी जखमी तरुण महेश विकास साळुंखे यांच्या फिर्यादीवरून दिनेश कोळी, राहुल कोळी, शरद परशुराम कोळी, निखिल गोकुळ कोळी, गोकुळ परशुराम कोळी (सर्व रा. गिधाडे, ता. शिरपूर) यांच्यासह अन्य चार ते पाच जणांविरोधात शिरपूर पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न आणि इतर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुलेटवर ट्रॅक्टर चढवून जीवे मारण्याचा प्रयत्न मिळालेल्या माहितीनुसार, महेश विकास साळुंखे हा २७ वर्षीय तरुण शिरपूर येथून गिधाडे गावाकडे जात असताना रस्त्यात दिनेश कोळी याने त्याला पाहिले. त्यानंतर त्याने ट्रॅक्टर साळुंखे यांच्या बुलेट दुचाकीवर चढवून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे.

या प्रसंगातून बचाव करण्यासाठी साळुंखे यांनी घटनास्थळावरून पळ काढला. त्यानंतर ट्रॅक्टरवरील दिनेश कोळी याने त्यांच्या बुलेटची तोडफोड केल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. रुग्णालयातही नातेवाईकांना मारहाण घटनेत जखमी झालेल्या महेश साळुंखे यांना उपचारासाठी शिरपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, तेथेही आरोपींनी त्यांच्या नातेवाईकांना मारहाण केल्याचा आरोप समोर आला आहे. त्यामुळे या प्रकरणाला अधिक गंभीर वळण मिळाले आहे. जखमी तरुणावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास घटनेचा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, या प्रकरणी शिरपूर पोलीस ठाण्यात आठ ते नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा पाटील करीत आहेत.

घरकुल योजनेतील अनियमिततेचा संशय; बांधकाम न करताच अनुदानाचा लाभ?

जन सम्राट टाईम्स

बोदवड । प्रतिनिधी : गरजू आणि पात्र लाभार्थ्यांना हक्काचे घर मिळावे, या उद्देशाने शासनाकडून विविध घरकुल योजना राबविण्यात येतात. पंचायत समिती बोदवडमार्फतही या योजनांची अंमलबजावणी केली जाते. मात्र, तालुक्यातील काही गावांमधील घरकुलांच्या सद्यस्थितीवरून योजनेच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित होत असून, संभाव्य अनियमिततेची चौकशी करण्याची मागणी पुढे येत आहे. तालुक्यातील काही गावांमध्ये लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ मिळाल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात बांधकाम पूर्ण झाले आहे का, याबाबत शंका व्यक्त केली जात आहे. काही ठिकाणी घरकुलाचे बांधकाम न करताच किंवा अपूर्ण बांधकाम असतानाही घरकुल पूर्ण झाल्याची नोंद करण्यात आली आहे का, याची पडताळणी होणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अनुदान वितरण आणि पूर्णत्वाच्या



नोंदींची पडताळणी गरजेची घरकुल योजनेअंतर्गत अनुदानाचे हप्ते बांधकामाच्या प्रगतीनुसार वितरित केले जातात. त्यामुळे अनुदान देण्यापूर्वी प्रत्यक्ष बांधकामाची पाहणी झाली होती का, घरकुल पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र कोणी दिले आणि अनुदान वितरणासाठी कोणत्या नोंदींचा आधार घेण्यात आला, असे प्रश्न उपस्थित होत आहेत. घरकुलाचे बांधकाम न करता पूर्णत्वाची नोंद करण्यात आली असल्यास त्यामागील कारणे आणि संबंधितांची भूमिका तपासणे आवश्यक आहे. शासनाचा निधी प्रत्यक्ष घरांच्या निर्मितीसाठी वापरला गेला आहे की नाही, हे चौकशीतून स्पष्ट होणे गरजेचे आहे. लाभार्थ्यांपासून अधिकाऱ्यांपर्यंत जबाबदारी निश्चित करा! घरकुल बांधकाम न करता अनुदानाचा लाभ घेतल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्यास संबंधित लाभार्थ्यांसह नोंदींची पडताळणी करणारे कर्मचारी आणि जबाबदार अधिकाऱ्यांच्या भूमिकेचीही तपासणी होणे आवश्यक आहे. मात्र, कोणावरही निष्कर्षापूर्वी दोषारोप न करता प्रत्यक्ष पुरावे आणि अधिकृत नोंदींच्या आधारे चौकशी होणे गरजेचे आहे. गटविकास अधिकारी कारवाई करणार का? पंचायत समिती बोदवडच्या गटविकास अधिकाऱ्यांनी तालुक्यातील विविध गावांमधील मंजूर घरकुलांची प्रत्यक्ष स्थळपाहणी करावी. मंजूर घरकुलांची संख्या, वितरित अनुदान, बांधकामाची सद्यस्थिती आणि पूर्णत्वाच्या नोंदी यांची सखोल पडताळणी करावी.

वृद्ध दलित शेतमजुरावर जातिवाचक शिवीगाळ करीत जीवघेणा हल्ला!

जन सम्राट टाईम्स

फर्दापूर / सोयगाव (प्रतिनिधी): सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथे किरकोळ कारणावरून एका ६२ वर्षीय दलित शेतमजुराला जातिवाचक शिवीगाळ करून लाकडी दांडक्याने मारहाण केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या हल्ल्यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याचा आरोप असून, जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची तक्रारही करण्यात आली आहे. या प्रकरणी घटनेनंतर तब्बल ५२ दिवसांनी, २६ ऑक्टोबर २०२६ रोजी फर्दापूर पोलीस ठाण्यात १८ जणांविरुद्ध ॲट्रॉसिटी कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी मनोहर ओंकार जगताप (वय ६२, रा. सावळदबारा) यांनी दिलेल्या लेखी तक्रारीवरून हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, ४ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६.४५ ते ७.३० वाजेच्या दरम्यान ते बोलेरो जीपने गावातून घराकडे जात होते. चक्रधर स्वामी चौकातून जात असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या पाठीमागील बखळ जागेजवळ आणि अहिल्याबाई होळकर सभागृहाच्या बाजूला काही जणांनी त्यांचे वाहन अडविले. त्यानंतर संबंधितांनी गैरकायद्याची मंडळी जमवून संगनमताने अंगावर धावून येत जातिवाचक शिवीगाळ केली. तसेच 'तुला बघून घेतो' अशी धमकी देत लाकडी दांडक्याने डोक्यावर वार केला. या हल्ल्यात डोके फुटून गंभीर दुखापत झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे. याशिवाय बोलेरो जीपच्या डिक्कीमध्ये ठेवलेले ४८ हजार रुपये आणि मोबाईल हिसकावून नेल्याचाही आरोप करण्यात आला आहे. उपचारानंतरही तक्रार दाखल होण्यास विलंब? घटनेनंतर जखमी जगताप यांना प्रथम सोयगाव येथे उपचारासाठी नेण्यात आले. तेथून रेफरल पत्र देऊन जळगाव येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये जाण्याचा सल्ला देण्यात आला; मात्र त्यांनी जामनेर येथील सिटी हॉस्पिटलमध्ये उपचार घेतल्याचे तक्रारीत नमूद आहे. सुरुवातीला फर्दापूर पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला नसल्याचा तसेच पोलीस पाटील आणि काही व्यक्तींनी दडपशाही केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या आरोपांबाबत स्वतंत्र अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही. घरावर दगडफेक झाल्यानंतर गुन्हा दाखल फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, २६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९.३० ते १० वाजेच्या सुमारास पुन्हा आरोपींकडून त्यांच्या घरावर दगडफेक करण्यात आली. त्यानंतर त्याच दिवशी रात्री १०.३७ वाजता फर्दापूर पोलीस ठाण्यात लेखी तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. ॲट्रॉसिटीसह विविध कलमान्वये गुन्हा या प्रकरणी भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ मधील कलम ११९(१), ११८(१), ११५(२), १२५, १८९(२), १९१(२), १९०, ३५१(२), ३५२ तसेच अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ मधील कलम ३(२)(va), ३(१)(r) आणि ३(१)(s) अन्वये १८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक सुधीर भाऊसाहेब करीत आहेत. घटनेमुळे सावळदबारा परिसरातील दलित समाजात संताप व्यक्त होत असून, संबंधित आरोपींना तातडीने अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

देगलूरमध्ये 'संविधान जागृती' बैठकीत सखोल चर्चा; मान्यवरांचा विशेष गौरव!

जन सम्राट टाईम्स

देगलूर । प्रतिनिधी: नैतिक भीम क्रांती चॅरिटेबल ट्रस्ट, सुंडगी यांच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात येणाऱ्या 'गाव-गाव संविधान जागृती अभियाना'च्या विस्तारासाठी देगलूर येथील एन. बी. इंग्लिश अकॅडमीमध्ये महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत अभियानाच्या पुढील नियोजनासह विविध संविधानिक विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

तसेच अभियानाशी संबंधित मान्यवरांचा विशेष सन्मान करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. महाराष्ट्रभर अभियान विस्ताराचे नियोजन १४ एप्रिल २०२६ पासून सुरू होणाऱ्या या दोन वर्षे, ११ महिने आणि १८ दिवसांच्या प्रदीर्घ अभियानाचा महाराष्ट्रभर विस्तार करण्याबाबत बैठकीत सविस्तर मंथन झाले. पदाधिकाऱ्यांवर जबाबदाऱ्यांचे वाटप आणि गावागावांत संविधान जागृतीचे कार्य पोहोचविण्याच्या नियोजनावर चर्चा करण्यात आली. संविधानातील मूल्ये, नागरिकांचे अधिकार आणि कर्तव्ये याबाबत समाजाच्या तळागाळापर्यंत जागृती



निर्माण करण्यासाठी संघटित प्रयत्न करण्यावर उपस्थितांनी भर दिला. मान्यवरांचा विशेष सन्मान या प्रसंगी अभियानाचे संस्थापक अध्यक्ष बालाजी कांबळे, प्रमुख पाहुणे तथा राज्यघटना अभ्यासक प्राचार्य संघशिल भद्रे ऊर्फ एस. एन. नांदेडकर सर, महाराष्ट्ररत्न पुरस्कारप्राप्त मंगलदीप सिताफुले आणि रोहित दिवटीवाड यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला मारोती कांबळे मरखेलकर, सूर्यवंशी सर, सावित्री शेवाळकर आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संविधान जागृतीसाठी कार्यकर्त्यांचा संकल्प बैठकीच्या यशस्वी आयोजनानंतर 'गाव-गाव संविधान जागृती अभियान' अधिक व्यापक स्वरूपात राबवून ते तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. संविधानिक मूल्यांची जाणीव समाजात रुजविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने आणि जबाबदारीने कार्य करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. नैतिक भीम क्रांती चॅरिटेबल ट्रस्ट, सुंडगी यांच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात येणाऱ्या 'गाव-गाव संविधान जागृती अभियाना'च्या विस्तारासाठी देगलूर येथील एन. बी. इंग्लिश अकॅडमीमध्ये महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत अभियानाच्या पुढील नियोजनासह विविध संविधानिक विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. तसेच अभियानाशी संबंधित मान्यवरांचा विशेष सन्मान करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

भुसावळमध्ये 'हिरकणी सन्मान सोहळा 2026' उत्साहात संपन्न!

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या २० गुणवंत महिला व संस्थांचा गौरव!

जन सम्राट टाईम्स

भुसावळ । प्रतिनिधी: भुसावळ येथे 'हिरकणी सन्मान सोहळा २०२६' मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून समाजासमोर आदर्श निर्माण करणाऱ्या २० गुणवंत महिला आणि संस्थांचा या सोहळ्यात सन्मान करण्यात आला. मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्वागत आणि सत्कार सत्रानंतर पुरस्कार वितरण व सांस्कृतिक कार्यक्रमांनी सोहळ्याची रंगत वाढवली. मान्यवरांच्या हस्ते स्वागत व सत्कार कार्यक्रमात प्रतिष्ठा महिला मंडळ, भुसावळच्या अध्यक्षा रजनीताई सावकारे, बियाणी प्रोजेक्टच्या संगीताताई बियाणी, माजी नगराध्यक्ष तथा जय गणेश फाउंडेशनचे अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) जिल्हाध्यक्ष उमेशभाऊ नेमाडे, गोल्डन अवर हॉस्पिटलचे संचालक डॉ. शांतनू कुमार साहू, नंदग्राम गोधामचे संचालक अभिलाष नागला सर, सक्षम नारी फाउंडेशनच्या अध्यक्षा तथा अर्पण हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. सुवर्णा गाडेकर आणि आस बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष महेंद्र पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते सप्तरंग एन्टरटेनमेंट व इव्हेंट्सचे संचालक पंकज कासार आणि आस बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष



महेंद्र पाटील यांचा सत्कार करण्यात आला. 'हिरकणी सन्मान २०२६'चे मानकरी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या खालील महिला व संस्थांना 'हिरकणी सन्मान २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले. पोलीस दल : मीनाक्षी घेटे वैद्यकीय क्षेत्र : डॉ. वृषाली चौधरी, डॉ. गोरी खानापुरकर संगीत क्षेत्र : अनिता पाटील, आरती मोरे शैक्षणिक क्षेत्र : प्रा. वंदना ठोके, प्रा. नोना कटलर राजकीय व सामाजिक क्षेत्र : प्रीती पाटील विधी क्षेत्र : ॲड. वृषाली शिरनामे, ॲड. कल्पना टेमाणी शैक्षणिक व कला क्षेत्र : स्नेहा लड्ढा ब्युटी व सौंदर्यशास्त्र : रत्ना पाटील, गायत्री कुमावत, तन्वी सूर्यवंशी उद्योजिका : सुष्मता भिडे (फैजपूर) झुंबा व योगा : पारुल वर्मा सामाजिक क्षेत्र : नूतन फालक नृत्य क्षेत्र : प्रियंका जाधव संस्था : आर्या बहुउद्देशीय सेवा फाउंडेशन, भुसावळ आणि महिला पतंजली योग समिती, भुसावळ टीम. सांस्कृतिक कार्यक्रमांनी जिंकली उपस्थितांची मने सन्मान सोहळ्यादरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मयूर मोरे यांनी गणेशगीत सादर केले. मयूर मोरे आणि आरती मोरे यांच्या कलाविष्काराने उपस्थितांचे मनोरंजन केले. तसेच डॉ. शांतनू कुमार साहू यांच्या विशेष सांस्कृतिक सादरीकरणाने कार्यक्रमात उत्साहाची भर घातली. विविध क्षेत्रांत कार्यरत महिलांच्या योगदानाची दखल घेत त्यांना व्यासपीठावर सन्मानित करण्याचा हा उपक्रम उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला. महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव आणि सामाजिक योगदानाला प्रोत्साहन देणारा हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.भुसावळ येथे 'हिरकणी सन्मान सोहळा २०२६' मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून समाजासमोर आदर्श निर्माण करणाऱ्या २० गुणवंत महिला आणि संस्थांचा या सोहळ्यात सन्मान करण्यात आला. मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्वागत आणि सत्कार सत्रानंतर पुरस्कार वितरण व सांस्कृतिक कार्यक्रमांनी सोहळ्याची रंगत वाढवली.

राजगोपालचारी उद्यानातील डीपी बालकांसाठी धोकादायक!

जन सम्राट टाईम्स

परभणी । प्रतिनिधी: शहरातील राजगोपालचारी उद्यानात बसविण्यात आलेला विद्युत डीपी (वीज वितरण पेटी) उघड्या अवस्थेत असल्याने लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या डीपीमधील विद्युत उपकरणे आणि तारा उघड्यावर दिसत असून, उद्यानात खेळण्यासाठी येणाऱ्या बालकांसाठी ही स्थिती धोकादायक ठरण्याची शक्यता आहे. अनावधानाने संपर्क झाल्यास दुर्घटनेची भीती राजगोपालचारी उद्यानात दररोज लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने येत असतात. उद्यानातील खेळण्यांच्या परिसरापासून काही अंतरावरच हा विद्युत डीपी आहे. मात्र, त्याचे झाकण उघडे असल्याने आतील विद्युत उपकरणे व तारा सहजपणे नजरेस पडतात. खेळताना एखाद्या बालकाचा अनवधानाने या विद्युत तारांशी संपर्क आल्यास गंभीर दुर्घटना घडण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करा! संबंधित विद्युत विभाग आणि महानगरपालिका प्रशासनाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. विद्युत डीपीची योग्य दुरुस्ती करून त्याला सुरक्षित झाकण बसवावे, तसेच परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. उद्यान हे लहान मुलांसह सर्व नागरिकांसाठी सुरक्षित असणे आवश्यक आहे. त्यामुळे कोणतीही दुर्घटना घडण्याची वाट न पाहता प्रशासनाने वेळीच कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

बळीराजा त्रस्त, कृषी अधिकारी मस्त! बियाण्यांच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह?

मलकापूर परिसरातील कृषी केंद्रांमध्ये निकृष्ट अथवा बोगस बियाणे विक्रीचा संशय

जन सम्राट टाईम्स

मलकापूर । प्रतिनिधी: एकीकडे नैसर्गिक संकटे, वाढता उत्पादन खर्च, कर्जबाजारीपणा आणि शेतीमालाला मिळणारा अपुरा भाव अशा अनेक समस्यांनी बळीराजा त्रस्त असताना आता बियाण्यांच्या गुणवत्तेबाबतही शेतकऱ्यांच्या मनात चिंता निर्माण झाली आहे. मलकापूर परिसरातील काही कृषी केंद्रांमध्ये निकृष्ट अथवा बोगस बियाण्यांची विक्री होत असल्याचा संशय शेतकरी वर्गातून व्यक्त केला जात आहे. त्यामुळे कृषी विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, कृषी अधिकारी नेमकी कोणती कारवाई करतात, असा संतप्त सवाल शेतकरी उपस्थित करीत आहेत. कर्ज काढून बियाणे खरेदी; पीक न आल्यास जबाबदार कोण? शेतकरी मोठ्या आशेने आणि प्रसंगी कर्ज काढून पेरणीसाठी बियाणे, खते व कीटकनाशकांची खरेदी करतो. चांगले पीक येईल आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह होईल, या अपेक्षेने तो शेतात मेहनत घेतो. मात्र खरेदी केलेले बियाणे अपेक्षित उगवण देत नसेल किंवा त्याचा दर्जा निकृष्ट आढळला, तर शेतकऱ्याचे संपूर्ण आर्थिक गणित कोलमडण्याची शक्यता असते. अशा वेळी शेतकऱ्यांच्या कष्टाच्या पैशांची जबाबदारी कोण घेणार, हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. कृषी केंद्रांची अचानक तपासणी कधी? कृषी केंद्रांवर विक्री होणाऱ्या बियाण्यांची गुणवत्ता, वैधता, साठा, खरेदी-विक्रीची कागदपत्रे आणि उगवण क्षमता यांची नियमित तपासणी केली जाते का? संबंधित कृषी अधिकारी प्रत्यक्ष कृषी केंद्रांना भेटी देतात का? तक्रारी प्राप्त झाल्यानंतर किती प्रकरणांमध्ये कारवाई केली जाते? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. केवळ कार्यालयात बसून कागदोपत्री तपासणी करण्याऐवजी कृषी विभागाने प्रत्यक्ष मैदानात उतरून कृषी केंद्रांची अचानक तपासणी करावी. संशयास्पद बियाण्यांचे नमुने प्रयोगशाळेत पाठवून त्यांची गुणवत्ता तपासावी आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी



वर्गातून होत आहे. बियाणे खरेदी करताना विश्वास कोणावर ठेवायचा? बोगस बियाण्यांच्या विक्रीचा संशय व्यक्त होत असताना कृषी विभागाने स्वतःहून पुढाकार घेऊन वस्तुस्थिती तपासणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी संबंधित यंत्रणेने प्रभावी नियंत्रण ठेवण्याची गरज आहे. बियाण्यांच्या गुणवत्तेबाबत तक्रारी असल्यास त्यांची गांभीर्याने दखल घेऊन तपासणी व आवश्यक कारवाई करणे अपेक्षित आहे. बळीराजा आधीच विविध संकटांनी त्रस्त असताना त्याच्या शेतीच्या भविष्याशी खेळ होऊ नये. कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात आणि कृषी केंद्रांच्या कारभाराची सखोल चौकशी करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या प्रश्नांची उत्तरे कृषी विभागाने द्यावीत, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे. आता कृषी विभाग या तक्रारींची दखल घेऊन प्रत्यक्ष तपासणी करतो का आणि संशयास्पद बियाण्यांच्या विक्रीबाबत वस्तुस्थिती स्पष्ट करतो का, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. एकीकडे नैसर्गिक संकटे, वाढता उत्पादन खर्च, कर्जबाजारीपणा आणि शेतीमालाला मिळणारा अपुरा भाव अशा अनेक समस्यांनी बळीराजा त्रस्त असताना आता बियाण्यांच्या गुणवत्तेबाबतही शेतकऱ्यांच्या मनात चिंता निर्माण झाली आहे. मलकापूर परिसरातील काही कृषी केंद्रांमध्ये निकृष्ट अथवा बोगस बियाण्यांची विक्री होत असल्याचा संशय शेतकरी वर्गातून व्यक्त केला जात आहे. त्यामुळे कृषी विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, कृषी अधिकारी नेमकी कोणती कारवाई करतात, असा संतप्त सवाल शेतकरी उपस्थित करीत आहेत. कर्ज काढून बियाणे खरेदी; पीक न आल्यास जबाबदार कोण? शेतकरी मोठ्या आशेने आणि प्रसंगी कर्ज काढून पेरणीसाठी बियाणे, खते व कीटकनाशकांची खरेदी करतो. चांगले पीक येईल आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह होईल, या अपेक्षेने तो शेतात मेहनत घेतो. मात्र खरेदी केलेले बियाणे अपेक्षित उगवण देत नसेल किंवा त्याचा दर्जा निकृष्ट आढळला, तर शेतकऱ्याचे संपूर्ण आर्थिक गणित कोलमडण्याची शक्यता असते. अशा वेळी शेतकऱ्यांच्या कष्टाच्या पैशांची जबाबदारी कोण घेणार, हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. कृषी केंद्रांची अचानक तपासणी कधी? कृषी केंद्रांवर विक्री होणाऱ्या बियाण्यांची गुणवत्ता, वैधता, साठा, खरेदी-विक्रीची कागदपत्रे आणि उगवण क्षमता यांची नियमित तपासणी केली जाते का? संबंधित कृषी अधिकारी प्रत्यक्ष कृषी केंद्रांना भेटी देतात का? तक्रारी प्राप्त झाल्यानंतर किती प्रकरणांमध्ये कारवाई केली जाते? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. केवळ कार्यालयात बसून कागदोपत्री तपासणी करण्याऐवजी कृषी विभागाने प्रत्यक्ष मैदानात उतरून कृषी केंद्रांची अचानक तपासणी करावी. संशयास्पद बियाण्यांचे नमुने प्रयोगशाळेत पाठवून त्यांची गुणवत्ता तपासावी आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. बियाणे खरेदी करताना विश्वास कोणावर ठेवायचा? बोगस बियाण्यांच्या विक्रीचा संशय व्यक्त होत असताना कृषी विभागाने स्वतःहून पुढाकार घेऊन वस्तुस्थिती तपासणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी संबंधित यंत्रणेने प्रभावी नियंत्रण ठेवण्याची गरज आहे. बियाणे अपेक्षित उगवण देत नसेल किंवा त्याचा दर्जा निकृष्ट आढळला, तर शेतकऱ्याचे संपूर्ण आर्थिक गणित कोलमडण्याची शक्यता असते. अशा वेळी शेतकऱ्यांच्या कष्टाच्या पैशांची जबाबदारी कोण घेणार, हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. कृषी केंद्रांची अचानक तपासणी कधी? कृषी केंद्रांवर विक्री होणाऱ्या बियाण्यांची गुणवत्ता, वैधता, साठा, खरेदी-विक्रीची कागदपत्रे आणि उगवण क्षमता यांची नियमित तपासणी केली जाते का? संबंधित कृषी अधिकारी प्रत्यक्ष कृषी केंद्रांना भेटी देतात का? तक्रारी प्राप्त झाल्यानंतर किती प्रकरणांमध्ये कारवाई केली जाते? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. केवळ कार्यालयात बसून कागदोपत्री तपासणी करण्याऐवजी कृषी विभागाने प्रत्यक्ष मैदानात उतरून कृषी केंद्रांची अचानक तपासणी करावी. संशयास्पद बियाण्यांचे नमुने प्रयोगशाळेत पाठवून त्यांची गुणवत्ता तपासावी आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. बियाणे खरेदी करताना विश्वास कोणावर ठेवायचा? बोगस बियाण्यांच्या विक्रीचा संशय व्यक्त होत असताना कृषी विभागाने स्वतःहून पुढाकार घेऊन वस्तुस्थिती तपासणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी संबंधित यंत्रणेने प्रभावी नियंत्रण ठेवण्याची गरज आहे.

धुळे डिस्ट्रिक्ट कोर्ट लॉ-लायब्ररी निवडणुकीत ॲड. जगदीश सूर्यवंशी यांच्या पॅनलचा ऐतिहासिक विजय!

जन सम्राट टाईम्स

धुळे | प्रतिनिधी : धुळे डिस्ट्रिक्ट कोर्ट लॉ-लायब्ररीच्या निवडणुकीत ॲड. जगदीश गंगाधर सूर्यवंशी यांच्या पॅनलने घवघवीत विजय संपादन केला. या निवडणुकीत चेअरमनपदी ॲड. जगदीश गंगाधर सूर्यवंशी, व्हाईस चेअरमनपदी ॲड. दिनेश गायकवाड, सचिवपदी ॲड. समीर सोनवणे आणि सहसचिवपदी ॲड. नितेश बोरसे यांची निवड झाली. ज्येष्ठांचे मार्गदर्शन, सहकाऱ्यांचे नियोजन आणि संपूर्ण टीमच्या एकजुटीच्या प्रयत्नांना या विजयामुळे यश मिळाले आहे. ज्येष्ठ तसेच नवोदित वकिलांशी संवाद साधत लायब्ररीच्या विकासाची भूमिका मतदारांसमोर मांडण्यात आली. रणनीती, नियोजन आणि लोकसंपर्काची प्रभावी सांगड या निवडणुकीत ॲड. राहुल पाटील यांनी प्रचाराची रणनीती आखणे आणि सहकाऱ्यांना एकत्र आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. ॲड. जगदीश सूर्यवंशी आणि ॲड. राहुल पाटील यांच्यातील परस्पर विश्वास व समन्वयाच्या बळावर प्रचाराचे नियोजन करण्यात आले. जबाबदाऱ्यांचे योग्य वाटप आणि सातत्यपूर्ण मतदार संपर्कामुळे पॅनलच्या प्रचाराला गती मिळाली. मतदानाच्या दिवशी सकाळी आठ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत ॲड. भिसे यांनी वकील बांधवांशी सातत्याने संवाद साधला. सहकाऱ्यांमधील समन्वय आणि मतदारांशी असलेला जिव्हाळ्याचा संपर्क या प्रचारातील महत्त्वाच्या बाबी ठरल्या. ज्येष्ठांचे मार्गदर्शन, सहकाऱ्यांची मेहनत निवडणुकीच्या संपूर्ण वाटचालीत गुरुवर्य ॲड. रवी दादा देसरडा सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य ॲड. ज्ञानेश्वर बागुल सर आणि ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. एल. पी. ठाकूर सर यांचेही मार्गदर्शन पॅनलला मिळाले. पॅनलच्या विजयासाठी ॲड. हितेश कबाडे, ॲड. अभिजीत पाटील, ॲड. प्रशांत चौधरी, ॲड. बळीराम वाघ, ॲड. पी. एस. महाजन, ॲड. सौ. प्रभावती माळी, ॲड. सुधा जैन, ॲड. उमेश सूर्यवंशी, ॲड. विनोद सोनवणे, ॲड. गजानन माळी, ॲड. नितीन पाटील, ॲड. संदीप खैरनार, ॲड. सतीश मुसळे, ॲड. राहुल माळी, ॲड. मनीष वाघ आणि प्रशांत सूर्यवंशी यांनी परिश्रम घेतले. प्रचार, मतदार संपर्क आणि संघटनात्मक कामात या सर्व सहकाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. लॉ-लायब्ररीच्या विकासाचा नवा संकल्प निवडणुकीत मांडलेल्या विकासाच्या भूमिकेनुसार लॉ-लायब्ररीचे डिजिटलायझेशन, आधुनिक वाचन सुविधा, कायदेविषयक संदर्भसाहित्याची उपलब्धता आणि अभ्यासासाठी पोषक वातावरणनिर्मिती यांना प्राधान्य देण्याचा नवनिर्वाचित पॅनलचा संकल्प आहे.

ग्रामीण भागातून साहित्य चळवळ चालवणे कौतुकास्पद!



जन सम्राट टाईम्स

नाशिक । प्रतिनिधी : शहरांमध्ये सुशिक्षित लोकांची संख्या मोठी असतानाही वाचन चळवळ टिकवणे जिकिरीचे ठरत आहे. अशा परिस्थितीत ग्रामीण भागातून संपादक नवनाथ गायकर आणि त्यांचे सहकारी गेल्या पंधरा वर्षांपासून सातत्याने साहित्य चळवळ चालवत आहेत, ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे, असे गौरवोद्गार सा.वा.ना.चे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके यांनी काढले. इगतपुरी तालुक्यातील आहुर्ली येथून संपादक नवनाथ अर्जुन पाटील गायकर यांच्या पुढाकारातून दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या 'साहित्य परिषद' दिवाळी अंकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. साहित्यिक चळवळीचा १५ वर्षांचा प्रवास कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सा.वा.ना.चे पदाधिकारी संजय करंजकर, सोमनाथ मुठाळ, डॉ. धर्मा बोडके, ज्येष्ठ साहित्यिक तथा विचारवंत सावळीराम तिदमे, डॉ. भास्कर म्हसराळे, प्रदीप पाटील, सुहास टिपरे, नाशिक जिल्हाध्यक्ष माणिकराव गोडसे, सौ. विद्या पाटील, गणेश बर्वे, संजय आहेर आणि बिरारी ताई आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकात संपादक नवनाथ गायकर यांनी सलग पंधरा वर्षांपासून सुरू असलेल्या साहित्यिक प्रवासाचा आढावा घेतला. अनेक अडचणींचा सामना करूनही ही चळवळ ठामपणे सुरू असून दिवसेंदिवस अधिक सशक्त होत असल्याचे त्यांनी सांगितले. मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन सोहळा ग्रामीण भागात साहित्य आणि वाचन संस्कृती रुजविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली. साहित्य परिषद दिवाळी अंकाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नाशिक अध्यक्ष रवींद्र पाटील यांनी केले, तर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब गिरी यांनी आभार मानले.

NCMC कार्ड सवलतीच्या नावाखाली प्रवाशांची लूट

जन सम्राट टाईम्स

धरणगाव । प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) राष्ट्रीय सामाईक गतिशीलता कार्ड (एनसीएमसी) स्मार्ट कार्डची सक्ती करून सामान्य प्रवाशांच्या खिशावर डल्ला मारला आहे. सवलतीच्या नावाखाली प्रवाशांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचा घणाघाती आरोप महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केला आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी सुरू करण्यात आलेली ही योजना एसटी प्रशासनाच्या चुकीच्या अंमलबजावणीमुळे प्रवाशांसह वाहकांसाठीही डोकेदुखी ठरली आहे, असा संताप त्यांनी व्यक्त केला. केंद्र सरकारच्या 'एक राष्ट्र, एक कार्ड' या संकल्पनेनुसार एकाच राष्ट्रीय सामाईक गतिशीलता कार्डाद्वारे देशभरातील मेट्रो, बस, टोलनाके आणि सार्वजनिक वाहतूक सेवांचा लाभ घेता यावा, हा या योजनेचा मूळ उद्देश आहे. मात्र, एसटी महामंडळाने या संकल्पनेलाच हरताळ फासल्याचा आरोप बरगे यांनी केला. एसटी महामंडळाने १ एप्रिल २०२६ पासून सवलतधारकांसाठी १९९ रुपये किमतीचे राष्ट्रीय सामाईक गतिशीलता कार्ड अनिवार्य केले, तर १ सप्टेंबरपासून जुने पास बंद केले. त्यामुळे विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना सवलतीचा लाभ घेण्यासाठी सक्तीने कार्ड खरेदी करावे लागत आहे.

सावद्यात ऑल इंडिया पँथर सेनेत २० तरुणांचा जाहीर प्रवेश!

विश्रामगृहात प्रवेश सोहळा उत्साहात; तालुक्यात संघटनात्मक विस्ताराला बळ

जन सम्राट टाईम्स

सावदा। प्रतिनिधी : रावेर तालुक्यातील सावदा येथे १ नोव्हेंबर २०२६ रोजी ऑल इंडिया पँथर सेनेचा कार्यकर्ता प्रवेश सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी तब्बल २० तरुणांनी संघटनेत जाहीर प्रवेश करून पँथर सेनेच्या विचारधारेनुसार सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धार व्यक्त केला. या प्रवेशामुळे यावल आणि रावेर तालुक्यात संघटनेच्या विस्ताराला बळ मिळणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती सावदा येथील विश्रामगृहात आयोजित या कार्यक्रमाला ऑल



इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष लखन भाऊ पानपाटील, उपजिल्हाध्यक्ष अजय भाऊ शेलार, जिल्हा कार्याध्यक्ष अक्षय भाऊ वाघ, यावल तालुकाध्यक्ष सतीश भाऊ अडकमोल आणि सावदा शहराध्यक्ष सचिन भाऊ तायडे यांच्यासह यावल व रावेर तालुक्यातील विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. विविध पदांवर नव्या नियुक्त्या जाहीर प्रवेश सोहळ्यादरम्यान संघटनेच्या कार्यविस्ताराच्या दृष्टीने काही कार्यकर्त्यांच्या पदनियुक्त्याही जाहीर करण्यात आल्या. त्यामध्ये दयाराम लोटू पाटील यांची यावल तालुका उपाध्यक्षपदी, फिरोज भिकारी तडवी यांची रावेर युवा तालुका उपाध्यक्षपदी आणि धीरज भगवान तायडे यांची यावल तालुका युवा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. तसेच दीपक हिरामण मेढे यांची यावल तालुका युवक अध्यक्षपदी, शेख फारुक शेख मुस्ताक यांची यावल शहराध्यक्षपदी, इरफान गुलशेर तडवी यांची यावल तालुका युवा सचिवपदी, तर दिलीप किसन अडकमोल यांची यावल तालुका कार्याध्यक्षपदी निवड जाहीर करण्यात आली. सामाजिक चळवळीला नवी ऊर्जा नवीन कार्यकर्त्यांच्या प्रवेशामुळे संघटनेच्या सामाजिक कार्याला नवी दिशा आणि ऊर्जा मिळेल, असा विश्वास यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. आगामी काळात परिसरातील विविध सामाजिक प्रश्नांवर संघटनेच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे आवाज उठविण्याचा निर्धारही कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

नशिराबादमध्ये अवैध गोमांस विक्रीचा पर्दाफाश; पोलिसांची धाड, संशयित पसार!

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद । प्रतिनिधी : नशिराबाद येथील इस्लामपुरा परिसरात कथित अवैध गोमांस विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी धाड टाकून अंदाजे २० किलो गोवंश सदृश्य मांस, वजनकाटा आणि लोखंडी कोयता जप्त केला. जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे ४ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, पोलिसांची चाहूल लागताच संबंधित संशयित घटनास्थळावरून पसार झाला. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांची कारवाई रविवार, १ नोव्हेंबर २०२६ रोजी भुसावळ उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. बारबोले यांना नशिराबादच्या इस्लामपुरा भागात एका व्यक्तीकडून अवैधरीत्या गोमांस विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार नशिराबाद पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता



नारखेडे यांच्या आदेशाने पोलीस कॉन्स्टेबल रुपेश साळवे, तौसिफ पठाण आणि पोलीस हेड कॉन्स्टेबल रितेश चौधरी यांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांना पाहताच संशयिताची पळापळ पोलिसांनी परिसरात पाहणी केली असता, आबीद खान रफिक खान यांच्या घरासमोरील रस्त्यावर एक व्यक्ती गोवंश सदृश्य मांस लोखंडी कोयत्याने कापून विक्री करत असल्याचे आढळले. पोलिसांनी त्याला पकडण्यासाठी धाव घेतली असता, तो मांस आणि विक्रीसाठी वापरण्यात येणारे साहित्य घटनास्थळी सोडून पळून गेला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयिताचे नाव असलम कुरेशी अय्युब कुरेशी (वय ३०, रा. इस्लामपुरा, नशिराबाद) असे आहे. त्याच्याविरुद्ध यापूर्वीही गोवंश मांस विक्रीसंदर्भात गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. पोलिसांनी त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला; मात्र गल्लीबोळांचा फायदा घेत तो पसार झाला. मांसाचा नमुना वैज्ञानिक तपासणीसाठी घटनेनंतर पोलिसांनी पशुवैद्यकीय अधिकारी आणि पंचांना घटनास्थळी बोलावून पंचनामा केला. जप्त केलेल्या मांसाचा एक नमुना वैज्ञानिक तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आला आहे. उर्वरित मांसाची विल्हेवाट लावण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाशी संपर्क साधण्यात आला आहे. या प्रकरणी संशयित असलम कुरेशी याच्याविरुद्ध कायदेशीर फिर्याद दाखल करण्यात आली असून, पुढील तपास सहाय्यक फौजदार राजेंद्र ठाकरे (बक्कल क्रमांक ८०३) करीत आहेत. मांसाचा प्रकार निश्चित करण्यासाठी प्रयोगशाळेच्या अहवालाची प्रतीक्षा असून, पसार संशयिताचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

'युवारंग 2026'मध्ये मुळजी जेठा महाविद्यालयाचे सर्वसाधारण विजेतेपद!

चोपडा येथील दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय उपविजेते

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव 'युवारंग २०२६' आणि दिव्यांग महोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या महोत्सवात खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीच्या मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव यांनी विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. तर महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा यांनी सर्वसाधारण उपविजेतेपद मिळविले. विविध कलागुणांच्या सादरीकरणाने महोत्सवात रंगत



महोत्सवादरम्यान विविध कला आणि सांस्कृतिक स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. नृत्य, गायन, नाट्य आणि इतर सांस्कृतिक कलाप्रकारांत विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे प्रभावी सादरीकरण केले. स्पर्धांमधील चुरस आणि विद्यार्थ्यांचा उत्साह यामुळे संपूर्ण महोत्सवात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. समारोपप्रसंगी मान्यवरांच्या उपस्थितीत विजेत्या महाविद्यालयांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण; महोत्सवाचे विशेष आकर्षण यंदाच्या 'युवारंग २०२६' महोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे युवारंगाचा माजी विद्यार्थी हेमंत पाटील यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. एकेकाळी याच व्यासपीठावर विद्यार्थी म्हणून सहभागी झालेल्या माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते आज विजेत्यांना पारितोषिके प्रदान होणे, ही महोत्सवासाठी अभिमानाची बाब ठरली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा, त्यांच्यातील आत्मविश्वास वाढविणारा आणि सांस्कृतिक प्रतिभेला प्रोत्साहन देणारा 'युवारंग २०२६' महोत्सव उत्साहात संपन्न झाला. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव 'युवारंग २०२६' आणि दिव्यांग महोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या महोत्सवात खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीच्या मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव यांनी विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. तर महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा यांनी सर्वसाधारण उपविजेतेपद मिळविले. विविध कलागुणांच्या सादरीकरणाने महोत्सवात रंगत महोत्सवादरम्यान विविध कला आणि सांस्कृतिक स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. नृत्य, गायन, नाट्य आणि इतर सांस्कृतिक कलाप्रकारांत विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे प्रभावी सादरीकरण केले. स्पर्धांमधील चुरस आणि विद्यार्थ्यांचा उत्साह यामुळे संपूर्ण महोत्सवात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले.

माजी राज्यमंत्री घाटे यांना मान्यवरांची आदरांजली!

जन सम्राट टाईम्स

मुखेड। प्रतिनिधी: महाराष्ट्राचे माजी समाजकल्याण राज्यमंत्री स्वर्गीय मधुकरराव घाटे यांच्या ३२ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त मुखेड येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास तसेच प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. सामाजिक व राजकीय कार्याचे स्मरण कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी स्वर्गीय मधुकरराव घाटे यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याचे स्मरण केले. समाजकल्याण क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचा गौरव करत त्यांच्या कार्यकर्तृत्वाच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करून उपस्थितांनी आदरांजली



अर्पण केली. याप्रसंगी ॲड. राम शिलकंठम, अर्जुन गायकवाड सर, प्रा. संघशिल भद्रे ऊर्फ एस. एन. नांदेडकर सर यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्राचे माजी समाजकल्याण राज्यमंत्री स्वर्गीय मधुकरराव घाटे यांच्या ३२ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त मुखेड येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.